## ३३ 'जे तू आहे, ते आहे मी !'

जग बघुनी अंतर्मुख झालो, पारखले मी तुला-मला !
'जे तू आहे ते आहे मी' ओळखले मी तुला-मला !!
'चंद्र-सूर्य-नभ-भू-सृष्टीतून'
-तूच पेरल्या तुझ्या खुणा !
जिथे जिथे अस्पष्ट पाउले-
तुझी उमटली, कळे मना !
अवचित अघटित घडती घटना, अंतर्यामी झुले झुला !
'जे तू आहे, ते आहे मी' ओळखले मी तुला-मला !।।१।।

धर्म-ग्रंथ-प्रेषित-पैगंबर
संत सांगाती या विश्वी !
हृदयाच्या मंदिरी पेटवा,
आत्म-ज्ञान-दीप तेजस्वी !
चैतन्याचा रस सर्वस्वी, तूच वाटला मुला-फुला
'जे तू आहे, ते आहे मी' -ओळखले मी तुला-मला !!।।२।।

पिंडी ते ब्रह्मांडी फुलले,
तुझ्याच शुभ अस्तित्वाने !
जिथे पाहतो, तिथे उभा तू !
-बघतो मी साक्षित्वाने !!
तुझ्याच मंगल महातत्त्वाने, विश्व-खेळ हा मांडियला !
'जे तू आहे, ते आहे मी' ओळखले मी तुला मला !।।३।।

काळ-पुरुष तो सतत पुढे जा,
नाच तयाचा तो नंगा !
उत्पत्ति-स्थिती-लय-चक्रातुनि
जन्म-मृत्युच्या नित रांगा !
कुंडिलिनी ती महाजगदंबा, मुक्ति-मार्ग तो करी खुला !
'जे तू आहे, ते आहे मी' -ओळखले मी तुला-मला !! ।।४।।

० ० ०



## ३४ प्रसन्नता

कृपादृष्टि-ओलावे बहरे, प्रसन्नतेचा मळा !
प्रसन्नतेतुन, चिरंतनाची लाभे अमृत-कळा !।।धृ०।।

उष:काल न्हाउनी सुगंधी, 'प्रसन्नता' दे फुला !
कळ्याफुलांतुन अखंड झुलतो, प्रसन्नतेचा झुला !
प्रसन्नता दे संजीवनीला, गंधर्वांचा गळा !
प्रसन्नतेतुन, चिरंतनाची लाभे अमृत-कळा !।।१।।

प्रसन्नता ने प्रत्येकाला, कल्पतरुंच्या बनी !
आत्म-तत्त्व ते करी प्रकाशित, प्रसन्नता सद्गुणी !
प्रसन्नता देई खत-पाणी, कुंडलिनीच्या मुळा !
प्रसन्नतेतुन, चिरंतनाची लाभे अमृत-कळा !।।२।।

सर्व सिद्धिला होती, कारण प्रसन्न झाली मने !!
आत्म-भान दे सर्व माणसा, प्रसन्नता नांदणे !
देऊळपण ये प्रसन्नतेने, देहाच्या देवळा !
प्रसन्नतेने, चिरंतनाची लाभे अमृत-कळा !।।३।।

सत्कर्मांची निघे, पालखी शुभ प्रसन्नतेतुनी !
प्रसन्नते पुण्याई-राशी, रचित चला जीवन !
प्रसन्नता नेई उद्धरूनी, सात पिढ्यांच्या कुळा !
प्रसन्नतेतुन, चिरंतनाची लाभे अमृत-कळा ! ।।४।।

भजन-पूजन, प्रभु-कीर्तन करते, प्रसन्नता बहुगुणी !
भगवंताला उरी कोंडते, भुता नम्र होउनी !
प्रसन्नतेने पडे मोडुनी, जन्म-मरण-सापळा !
प्रसन्नतेतुन, चिरंतनाची लाभे अमृत-कळा !।।५।।

प्रसन्नतेने स्मशानातही फुलती, नंदनवने !
ऐन दुपारी भर उन्हातही पुनवेचे चांदणे !
प्रसन्न होई प्रसन्नतेने, विठ्ठल तो सावळा !
प्रसन्नतेतुन, चिरंतनाची लाभे अमृत-कळा !।।६।।

० ० ०